# <u>त्रिशंकू</u>

वरच्याला भुललो
खालच्या विसरलो
मध्ये लोंबकळलो
असा त्रिशंकू झालो ||१||

चालताना थकलो
चढण्या हबकलो
उतरण्यास भ्यालो
निर्बळ असा झालो ||२||

तळे सुखाचे समोर
पाठीस शोकसागर
बद्ध मी भयवेढ्यात
वेदनांच्या वणव्यात ||३||

यातून सोडवील
सहज उचलील
मला मोक्ष देईल
असा कोण भेटेल ||४||

– नारायण
०. ८/३१/२३